प्रेस नोट - मराठी व हिंदी

हरित ऊर्जेतील महाराष्ट्राच्या प्रयत्नांना राष्ट्रीय पातळीवर मान्यता

शिखर परिषदेत उपराष्ट्रपतींच्या हस्ते महाराष्ट्राला पुरस्कार

नवी दिल्ली, ५ नोव्हेंबर २०२६: मुख्यमंत्री मा. ना. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात सात आयामी दृष्टीकोनातून महाराष्ट्राने केलेल्या प्रयत्नांना राष्ट्रीय मान्यता मिळाली आहे. केंद्र शासनाच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय (MNRE) आणि पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन (PFC) यांच्या मूल्यांकन अहवालानुसार 'रिन्युएबल एनर्जी स्टेट असेसमेंट फ्रेमवर्क' (RE-SAF) अंतर्गत भारतामध्ये हरित ऊर्जेच्या निर्मिती आणि विकासात महाराष्ट्र राज्याला देशातील राज्यांमध्ये द्वितीय स्थान मिळाले आहे.

नवी दिल्ली येथील भारत मंडपम येथे आयोजित 'भारत नवीकरणीय ऊर्जा शिखर परिषद व प्रदर्शन २०२६' (Bharat RE Summit & Expo 2026) च्या समारोप सोहळ्यात गुरुवारी (दि. ५) मा. उपराष्ट्रपती श्री. सी. पी. राधाकृष्णन यांच्याहस्ते ऊर्जा राज्यमंत्री सौ. मेघना साकोरे-बोर्डीकर आणि अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला यांना पुरस्कार प्रदान करून महाराष्ट्राचा गौरव करण्यात आला. यावेळी केंद्रीय नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री मा. श्री. प्रल्हाद जोशी व राज्यमंत्री मा. श्री. श्रीपाद नाईक यांची प्रमुख उपस्थिती होती.

सात-आयामी सुधारणांमुळे बदल - पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदी यांच्या स्वच्छ, ऊर्जा-सुरक्षित आणि स्वावलंबी भारताच्या संकल्पनेला अनुसरून मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राने ऊर्जा क्षेत्राच्या बदलासाठी सात-आयामी दृष्टिकोन स्वीकारला आहे. या दृष्टिकोनामध्ये अक्षय ऊर्जा निर्मितीचा विस्तार, विकेंद्रित प्रकल्पांद्वारे कृषी क्षेत्राचे सक्षमीकरण, पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण, स्मार्ट मीटरिंगद्वारे डिजिटल रूपांतरण, धोरणात्मक सुधारणा, ऊर्जा साठवणुकीस प्रोत्साहन आणि परवडणाऱ्या वीज सेवांची उपलब्धता सुधारणे या सात परस्परसंबंधित घटकांचा समावेश आहे. या उपायांमुळे राज्यातील वीज निर्मिती, वितरण आणि वापराच्या पद्धतीमध्ये सकारात्मक बदल घडत आहे. महाराष्ट्राने हरित ऊर्जा विकासाला गती देण्यासाठी आणि वीज क्षेत्रात व्यापक सुधारणा करण्यासाठी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फलित देखील आता दिसू लागले आहेत.

महाराष्ट्राच्या कृषी सौरऊर्जा मॉडेलने वेधले देशाचे लक्ष - महाराष्ट्राच्या ऊर्जा रणनीतीचे एक प्रमुख वैशिष्ट्य असलेल्या व सौरक्रांतीचे माध्यम बनलेल्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० द्वारे कृषी वीजवाहिन्यांचे सौरऊर्जीकरण करण्यासाठी उपकेंद्रांजवळ विकेंद्रित सौरऊर्जा प्रकल्प विकसित करण्यात येत आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांच्या दिवसा व शाश्वत वीजपुरवठ्याचे स्वप्न साकार झाले आहे. या योजनेतून १६ हजार मेगावॅट क्षमतेचे विकेंद्रीत प्रकल्पांचे काम प्रगतीपथावर असून त्यातील सुमारे ७ हजार मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. त्याची फलनिष्पत्ती म्हणजे सध्या ४ हजार ५०० हून अधिक कृषी वीजवाहिन्या आणि १,२०० उपकेंद्रांच्या सौरऊर्जीकरणामुळे १८ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा सुरु झाला आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी 'एमएसईबी सोलर ॲग्रो पॉवर लिमिटेड' या स्वतंत्र कंपनीची स्थापना करण्यात आली असून, महाराष्ट्राचे हे फिडर-स्तरीय मॉडेल इतर राज्यांसाठीही मार्गदर्शक ठरत आहे.

कृषी आणि घरगुती क्षेत्रात सौर उपक्रमांचा विस्तार - यासोबतच, पीएम-कुसूम (घटक ब) आणि मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेमुळे सौर ऊर्जेच्या माध्यमातीन सिंचन क्षेत्रात मोठी वाढ झाली आहे. महाराष्ट्रात आतापर्यंत सुमारे १२ लाख ऑफ-ग्रिड सौर कृषी पंप बसवण्यात आले असून, हे प्रमाण देशातील

एकूण स्थापनेच्या ६५ टक्के आहे. अवघ्या ३० दिवसांत ४५,९११ कार्यरत सौर पंप बसवून महावितरणने 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड'मध्येही नोंद केली आहे. तसेच पीएम सूर्य घर मोफत वीज योजनेअंतर्गत छतावरील सौरऊर्जा वापरामध्ये राज्याने देशात दुसरा क्रमांक मिळवला आहे. या योजनेत महावितरणची एकूण छतावरील सौर प्रकल्पांची क्षमता ७ हजार १०० मेगावॅटपेक्षा अधिक झाली आहे. याशिवाय १७ गावांना पूर्णपणे सौरऊर्जेवर आणणारी 'सौर ग्राम योजना' आणि दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांसाठी 'स्मार्ट' योजना यासारख्या उपक्रमांतून हरित व स्वच्छ ऊर्जेचा फायदा शेवटच्या घटकापर्यंत प्रभावीपणे दिला जात आहे.

ऊर्जा विभागाचे नेतृत्व आणि संस्थात्मक समन्वय

राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला यांच्या प्रशासकीय नेतृत्वाखाली ऊर्जा विभागाने ही उत्तुंग कामगिरी केली आहे. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्यासह महाऊर्जा, महानिर्मिती आणि महापारेषण यासारख्या संस्थांच्या समन्वयामुळे राज्य सरकारची ध्येयधोरणे प्रत्यक्ष अंमलबजावणीत यशस्वी ठरत आहेत. हा पुरस्कार म्हणजे राज्यातील राजकीय नेतृत्व, प्रशासकीय यंत्रणा, अभियंते आणि कर्मचाऱ्यांच्या सामूहिक प्रयत्नांचे फलित आहे. सोबतच भारताच्या स्वच्छ ऊर्जा क्रांतीमधील महाराष्ट्राचे योगदान देखील अधिक अधोरेखित झाले आहे.

महाराष्ट्र के हरित ऊर्जा प्रयासों को राष्ट्रीय स्तर पर मान्यता; शिखर सम्मेलन में उपराष्ट्रपति ने महाराष्ट्र को किया सम्मानित

नई दिल्ली, 5 नवंबर 2026: मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस के नेतृत्व में सात-आयामी दृष्टिकोण के माध्यम से महाराष्ट्र द्वारा किए गए प्रयासों को राष्ट्रीय मान्यता मिली है। केंद्र सरकार के नवीन और नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय (MNRE) तथा पावर फाइनेंस कॉर्पोरेशन (PFC) के मूल्यांकन रिपोर्ट के अनुसार, 'रिन्यूएबल एनर्जी स्टेट असेसमेंट फ्रेमवर्क' (RE-SAF) के अंतर्गत भारत में हरित ऊर्जा के उत्पादन और विकास में महाराष्ट्र राज्य को देश के राज्यों में दूसरा स्थान प्राप्त हुआ है।

नई दिल्ली स्थित भारत मंडपम में आयोजित 'भारत नवीकरणीय ऊर्जा शिखर सम्मेलन एवं प्रदर्शनी 2026' (Bharat RE Summit & Expo 2026) के समापन समारोह में गुरुवार (दि. 5) को उपराष्ट्रपति श्री सी. पी. राधाकृष्णन के कर-कमलों से ऊर्जा राज्य मंत्री श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर और अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला को पुरस्कार प्रदान कर महाराष्ट्र का गौरव बढ़ाया गया। इस अवसर पर केंद्रीय नवीन और नवीकरणीय ऊर्जा मंत्री श्री प्रल्हाद जोशी और राज्य मंत्री श्री श्रीपाद नाइक प्रमुख रूप से उपस्थित थे।

सात-आयामी सुधारों से बदलाव - प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी के स्वच्छ, ऊर्जा-सुरक्षित और आत्मनिर्भर भारत के संकल्प के अनुरूप, मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस के नेतृत्व में महाराष्ट्र ने ऊर्जा क्षेत्र में परिवर्तन के लिए सात-आयामी दृष्टिकोण अपनाया है। इस दृष्टिकोण में अक्षय ऊर्जा उत्पादन का विस्तार, विकेंद्रीकृत परियोजनाओं के माध्यम से कृषि क्षेत्र का सशक्तिकरण, बुनियादी ढांचे का आधुनिकीकरण, स्मार्ट मीटरिंग के जरिए डिजिटल रूपांतरण, नीतिगत और संस्थागत सुधार, ऊर्जा भंडारण को प्रोत्साहन तथा किफायती बिजली सेवाओं की उपलब्धता में सुधार जैसे सात परस्पर जुड़े घटक शामिल हैं। इन उपायों के परिणामस्वरूप राज्य में बिजली उत्पादन, वितरण और उपयोग के तरीकों में सकारात्मक

बदलाव आ रहा है। महाराष्ट्र द्वारा हरित ऊर्जा विकास को गति देने और बिजली क्षेत्र में व्यापक सुधार करने के लिए किए गए निरंतर प्रयासों के परिणाम अब सामने आने लगे हैं।

महाराष्ट्र के कृषि सौर ऊर्जा मॉडल ने खींचा देश का ध्यान - महाराष्ट्र की ऊर्जा रणनीति की एक प्रमुख विशेषता और सौर क्रांति का माध्यम बनी 'मुख्यमंत्री सौर कृषि वाहिनी योजना 2.0' के तहत कृषि फीडरों के सौरत्रीकरण के लिए सब-स्टेशनों के पास विकेंद्रीकृत सौर ऊर्जा परियोजनाएं विकसित की जा रही हैं। इस योजना से किसानों को दिन में और निरंतर बिजली आपूर्ति का सपना साकार हुआ है। इस योजना के तहत 16 हजार मेगावाट क्षमता की विकेंद्रीकृत परियोजनाओं का काम प्रगति पर है, जिनमें से लगभग 7 हजार मेगावाट क्षमता की परियोजनाएं चालू हो चुकी हैं। इसका परिणाम यह है कि वर्तमान में 4,500 से अधिक कृषि फीडरों और 1,200 सब-स्टेशनों के सौरत्रीकरण से 18 लाख से अधिक किसानों को दिन में बिजली आपूर्ति शुरू हो गई है। इस योजना के कार्यान्वयन के लिए 'एमएसीबी सोलर एग्रो पावर लिमिटेड' नाम से एक स्वतंत्र कंपनी की स्थापना की गई है, और महाराष्ट्र का यह फीडर-स्तरीय मॉडल अन्य राज्यों के लिए भी मार्गदर्शक साबित हो रहा है।

कृषि और घरेलू क्षेत्रों में सौर उपक्रमों का विस्तार - इसके साथ ही, पीएम-कुसूम (घटक बी) और 'मागेल त्याला सौर कृषी पंप योजना' के माध्यम से सौर ऊर्जा के जरिए सिंचाई क्षेत्र में भारी वृद्धि हुई है। महाराष्ट्र में अब तक लगभग 12 लाख ऑफ-ग्रिड सौर कृषि पंप स्थापित किए गए हैं, जो देश में कुल संस्थापनों का 65 प्रतिशत है। महज 30 दिनों के भीतर 45,911 कार्यरत सौर पंप स्थापित कर महावितरण ने 'गिनीज वर्ल्ड रिकॉर्ड' में भी अपना नाम दर्ज कराया है। इसके अलावा, 'पीएम सूर्य घर मुफ्त बिजली योजना' के तहत छतों पर सौर ऊर्जा के उपयोग में राज्य ने देश में दूसरा स्थान प्राप्त किया है। इस योजना में महावितरण की कुल रूफटॉप सोलर परियोजनाओं की क्षमता 7 हजार 100 मेगावाट से अधिक हो गई है। इसके अलावा, 17 गांवों को पूरी तरह से सौर ऊर्जा से रोशन करने वाली 'सौर ग्राम योजना' और गरीबी रेखा से नीचे (BPL) के परिवारों के लिए 'स्मार्ट' योजना जैसे उपक्रमों के माध्यम से हरित और स्वच्छ ऊर्जा का लाभ समाज के अंतिम व्यक्ति तक प्रभावी ढंग से पहुंचाया जा रहा है।

ऊर्जा विभाग का नेतृत्व और संस्थागत समन्वय - राज्य की अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला के प्रशासनिक नेतृत्व में ऊर्जा विभाग ने यह उत्कृष्ट उपलब्धि हासिल की है। माननीय मुख्यमंत्री के अपर मुख्य सचिव और महावितरण के अध्यक्ष एवं प्रबंध निदेशक श्री लोकेश चंद्र के साथ-साथ महाऊर्जा, महानिर्मीती और महापारेषण जैसी संस्थाओं के आपसी समन्वय के कारण राज्य सरकार की नीतियां धरातल पर सफलतापूर्वक लागू हो रही हैं। यह पुरस्कार राज्य के राजनीतिक नेतृत्व, प्रशासनिक तंत्र, इंजीनियरों और कर्मचारियों के सामूहिक प्रयासों का फल है। साथ ही, इसने भारत की स्वच्छ ऊर्जा क्रांति में महाराष्ट्र के योगदान को और अधिक रेखांकित किया है।


Certificate